तरुण भारत संवाद

मंगळवार, २० जानेवारी २०२६



कोल्हापूर : डॉ. दीपक तुपे यांचा पुरस्कार देऊन गौरव करताना शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख व ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. वसंत मोरे. बाजूस डॉ. इरेश स्वामी,

# 'संघर्ष' अनुवाद पुरस्काराने डॉ. दीपक तुपे यांचा सन्मान

प्रतिनिधी

कोल्हापूर

महाराष्ट्र हिंदी परिषदेच्या वतीने विवेकानंद कॉलेजचे हिंदी विभागाचे साहा. प्रा. डॉ. दीपक तुपे यांचा डॉ. देवीदास बामणे 'संघर्ष' अनुवाद पुरस्काराने सन्मान करण्यात आला. विवेकानंद कॉलेज व महाराष्ट्र हिंदी परिषदेच्या वतीने आयोजित ३२ वे अधिवेशन व दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख व ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ डॉ. वसंत मोरे यांच्या हस्ते त्यांना सन्मानित केले.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, महाराष्ट्र हिंदी परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल काळे, मुख्य सचिव डॉ. गजानन चव्हाण, विवेकानंद कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय थोरात, डॉ. गजानन चव्हाण, आय. क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, डॉ. देवीदास बामणे उपस्थित होते.